खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## तृतीय वर्ष कला (TYBA)

## मराठी (एस - 3)

## सत्र : सहावे

# विषय : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा स्थूल इतिहास (इ.स.१६०० ते १८१७)

## घटक ३) बखर आणि गद्य वाङ्मयनिर्मिती

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

SANJAY MARHRM

# घटक ३ बखर आणि गद्य (वाङ्मयनिर्मिती

## १)बखर वाङ्मय प्रेरणा , स्वरूप

## (सभासदाची बखर, शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, शिवदिग्विजय, पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर)

## २. आज्ञापत्र

---

## बखर वाङ्मय : प्रेरणा व स्वरूप –

### बखर शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्तिमीमांसा –

'खबर' या मूळ अरबी शब्दाचा वर्णविपर्यास होऊन 'बखर' हा शब्द मराठीत आला, असे आजवर मानण्यात येत होते, मात्र हे काही खरे नाही. कारण ज्या फारशी भाषेच्या संपर्काने मराठयांनी इतिहास लेखनाची पद्धती स्वीकारली, त्या फारशी भाषेतही 'बखर' हा शब्द नाही. महिकावतीची बखर ते पेशव्यांची बखर या प्रदीर्घ काळात 'खबर' आणि 'बखर' हे दोन्ही शब्द स्वतंत्रपणे येतात. याचा अर्थ त्यांचे लेखन स्वरूप वेगवेगळे आहे. शिवाय बखैर, बखर असे शब्दरूपही व्यवहारात दिसून येते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश' तयार करून घेतला. त्यात 'खबर' आणि 'बखैर' हे दोन्ही शब्द व त्यांचे लेखनप्रकार वेगवेगळे असल्याची स्पष्ट नोंद आहे. खबर या शब्दाचा अर्थ वार्ता, बातमी असा आहे. तर बखैर म्हणजे आख्यायिका. त्यात गत इतिहास कथन केलेला असतो. मात्र तिचा हेतू घडलेल्या वर्तमानाची कथा सांगणे हा असतो.

थोडक्यात बखर शब्दाचे मूळरूप आणि अर्थ पाहता बखैर हा शब्द प्रस्थापित होतो. बखैर, बखेर, बखर अशी ही रूपे मूळ हस्तलिखितांच्या नकल प्रती होताना झाले आहेत. बखैर म्हणजे आख्यायिका आणि आख्यायिका म्हणजे इतिहास कथा. याच अर्थाने बखर शब्द मराठीत रूढ झाला आणि पुढे एका वाङ्मय प्रकाराच्या नावाने ओळखला गेला.

ओवी, अभंग, पोवाडा, लावणी या मराठी लेखनाविष्कारासारखा बखर हा देखील अस्सल मराठी लेखनाविष्कार आहे.

### बखर वाङ्मयाचे स्वरूप –

**बखरीत राजकीयदृष्ट्या इतिहास आणि वाङ्मयीनदृष्टया कथानिवेदन** हे दोन महत्त्वाचे घटक असतात. तसेच गद्यात्मक लेखन हा आणखी एक विशेष होय. **बखरीचे बहिरंग आणि अंतरंग असे दोन प्रकार पडतात.**

SANJAY MAR HRM

## अ) बखरीचे बहिरंग –

### १.पत्रलेखन संकेत –

पत्रलेखनाचा संकेत स्वीकारून जवळ–जवळ सर्वच बखरींचे लेखन झाले आहे. हा संकेत मुळात राजवट बदलण्याचा द्योतक आहे. पुढील काळात राजाश्रयाखाली झालेले लेखन व राजाज्ञेचे प्रतीक म्हणूनही तो शब्द तसाच रूढ झालेला आहे.

### २.राजाज्ञा –

आपल्या लेखनात राजाज्ञेची अधिकृतता आहे, याचे हे निदर्शक आहे. उदा. ‘सभासदाची बखर’ ही सभासदाने छत्रपती राजारामांच्या आज्ञेने लिहिली.

### ३.वंशानुचरित्र –

वंशानुचरित्र म्हणले वंशावळ. वंशानुचरित्र हे पुराण लेखनाचे एक लक्षण आहे.

### ४.फलश्रृती –

बखरीची सुरूवात पत्रलेखनाने तर अखेर फलश्रृतीने होते. प्राचीन व मध्ययुगीन काळात वाचकांपेक्षा श्रोतावर्ग संख्येने अधिक होता. या शिवाय घरोघरी देवघरात रामायण, महाभारत, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलिलामृत असे ग्रंथ असत. या ग्रंथांच्या सोबत आपल्या बखर ग्रंथाने बसावे अशी बखरकाराची अपेक्षा या फलश्रृतीमागे होती. शिवाय श्रोता आणि वाचक यांच्या दैनंदिन जीवनातही अशा आकांक्षांची असणारी अपेक्षापूर्ती त्या काळातील श्रद्धेची द्योतक होती. या दृष्टीने फलश्रृती महत्त्वाची आहे.

## ब) बखरीचे अंतरंग –

इतिहासाचे सुसंगत कथात्मक निवेदन हे बखरींचे मुख्य लक्षण आहे. बखर ही कोणाच्या अनुकरणातून निर्माण झाली नसून ती पूर्णपणे मराठमोळी आहे. बखर ही इतिकासातील घटकांची संघटना लावून त्याला कथात्मक रूप देते आणि व्यक्तींच्या भावभावनांचे व अंतरंगाचे दर्शन घडते.

### १.व्यक्तीदर्शन –

बखरीमध्ये इतिहासातील स्त्री–पुरूषांचे व्यक्तीचित्रण केलेले असते. मराठयांच्या इतिहासातील थोर आणि असामान्य अशा व्यक्तींच्या चित्रणातून बखरकारांनी मानवी जीवनाचे दर्शन घडविले. त्यांनी इतिहासातील व्यक्तींची रामायण, महाभारतातील व्यक्तींशी तुलना केलेली आढळते. उदा. पाणिपतचा रणसंग्राम हा कौरव पांडवांच्या इतिहासाची आठवण करून देतो असे म्हटले आहे.

### २.मानवी जीवनदर्शन –

मानवी जीवनातील भावभावनांचे, विचारांचे, विकारांचे, दर्शन बखरीतून घडते.

### ३.अभिव्यक्तीमधील विविधता –

बखरींची अभिव्यक्ती विविध प्रकारातून झालेली आहे. बखर ही कधी चरित्र, कधी एखादा युद्ध प्रसंग, कधी एखादी घटना तर कधी दौलतीचे विशाल रूप घेऊन अवतरते. बखरीत अद्भूतरम्यता आहे. अवतारकल्पना, चमत्कार वर्णन, स्वप्न दृष्टांतही आहेत. नदीने उतार देणे आहे, मंत्राने पाऊस पाडणे देखील आहे. बखर वाचकांनी वाचावी आणि श्रोत्यांनी ऐकावी यासाठी अभिव्यक्तीच्या विविधतेबरोबर ही रंजकता आली आहे.

### ४.भाषाशैली –

बखरींची भाषाशैली कथा निवेदनास साजेशी अशी आहे. कधी ती मराठमोळे रूप घेऊन येते. तर कधी संस्कृत साहित्यपरंपरेचा अभिमान वाटावा अशा स्वरूपात व्यक्त होते. लोकजीवनातील घटना प्रसंग घेऊन भाषा येते. फारशी शब्दांमुळे राजदरबारी थाटात इतिहासकालाचे रूप ती साकार करते. अशा प्रकारे भाषाशैलीची विविधता बखरीत दिसून येते.

## बखर निर्मितीमागील प्रेरणा –

शिवपूर्वकालीन व शिवकालीन बखरीमागील प्रेरणा सुप्त असून बखरीच्या वाङ्मयीन वैशिष्टयांवरून अनुमान करावे लागते. पेशवे काळात बखर वाङ्मयाला बहर आला आणि वाङ्मयीन प्रेरणेची जाणीव अधिक स्पष्ट झाली.

शिवकालातील **'शिवदिग्विजय'** ही बखर आख्यानाच्या धर्तीवर रंगली पाहिजे या प्रेरणेने बखरकाराने लिहिली आहे. ते लिहितात, 'इत्यंभूत व्यवस्थापूर्वक नेतपर्यंत बुद्धीची स्फूर्ती चालेल तितकी यथामतीने निवेदन करतो. तेथे चित्तास विकल्प येवो न द्यावा कारण ग्रंथाची धारणा, रूप, रंग, तीन प्रकार असावे येणेकरून श्रोत्यांस आनंद वाटतो.' तर काही बखरीमधील श्रोत्यांची आवड आणि बखरकारांचे सविस्तर कथन कौशल्य यातून वाङ्मयीन प्रेरणेचे दर्शन घडते. उदा. शाहूमहाराजांची बखर तर वाङ्मयीन प्रेरणेची जाणीव स्पष्टपणे व्यक्त करते. यात कथानिवेदनात आस्थापूर्वक जसा मजकूर झाला असेल तसा कळवावा ही अपेक्षा आहे.

राज्यातील घडामोडींची सविस्तर कथा सांगायची हे अत्यंत नाजूक काम होते. कारण खूप मोठा कालखंड अनेक व्यक्ती आणि घटना प्रसंगांनी भरलेला होता. नवनवे सरदार उदयाला येत चालले होते. त्यांच्यात आपापसात कलहप्रसंग निर्माण होऊ लागले होते. तेव्हा कमी अधिक सांगितले तर श्रोत्यांच्या मनात अकारण विकल्प निर्माण होऊ नये म्हणून बखरीत सविस्तर वर्णने केल्याचे दिसून येते. तसेच काही वेळा आपल्या बखरीबद्दल अनादर निर्माण होईल म्हणून बखरकार बखरींची लांबी कमी ठेवताना दिसतात. उदा. थोडा थोडा मजकूर यावा, तपशील थोडक्यात सांगावा, कथा संपूर्ण समजावी या कारणांनी श्रोत्यांकडून मिळालेल्या प्रोत्साहनाने बखरकारांना कथानिवेदनाचे बळ प्राप्त होत होते.



SANJAY MAR FIRM

थोडक्यात बखरींचे स्वरूप म्हणजेच बखरीचे बहिरंग आणि अंतरंग बारकाईने तपासून पाहिले असता बखर निर्मितीमागील वाङ्मयीन प्रेरणा, बखरकारांना असलेले इतिहासातील वास्तवाचे भान आणि वाङ्मयीन सौंदर्याची जाणीव कशी होती हे दिसून येते.

## बखर वाङ्मयाचा आढावा –

विषय आणि लेखनाची पद्धती यामुळे बखरीस स्वतंत्र वाङ्मय प्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. १७व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना झाली आणि मराठीला राज्यभाषेचे स्वरूप प्राप्त झाले. बखर साहित्य हा शिवकालीन व पेशवेकालीन गद्याचा कलात्मक आविष्कार आहे. बखरीचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्याऐवजी मराठे शाहीतील गद्य सारस्वताचा उत्कृष्ट नमूना म्हणूनही त्यातील वाङ्मय सौंदर्याचा विचार करता येतो. अशा या बखर वाङ्मयाचा आढावा घेताना कालानुक्रमाने व अभ्यासाच्या सोयीसाठी शिवपूर्वकालीन, शिवकालीन व पेशवेकालीन बखरी अशी विभागणी करता येते.

## शिवपूर्वकालीन बखरी –

### १.महिकावतीची अथवा माहिमची बखर –

ही रचना काळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर असून गद्य–पद्यात्मक अशा या बखरीतील प्रकरणे निरनिराळया लेखकांनी निरनिराळया काळात लिहिली आहेत. या बखरीचा लेखनकाळ इ. स. १४४८ ते १४७८ असा आहे. या बखरीतील सर्वात जुन्या म्हणजे दुसऱ्या प्रकरणाचा लेखक केशवाचार्य म्हणतो, ''आपणास मालाडच्या देसला नायकोराव याने सन्मानाने बोलावून महाराष्ट्र धर्म रक्षिण्यासाठी हे लेखन करवितो.'' इ.स. ११३८ च्या प्रतापबिंबापासून ते इ.स. १४५० च्या इंग्रजांच्या आगमनापर्यंतचा असा एकून सात राजवटींचा इतिहास यात आला आहे.

### २.राक्षसतागडीची बखर –

विजयनगरच्या विध्वसांच्या ऐतिहासिक प्रसंगाची माहिती असलेली बखर म्हणजे राक्षसतागडीची बखर होय. मूळ कानडी बखरीच्या आधारे विजयनगरच्या विध्वंसाची माहिती दिली आहे. व्यक्तीवर्णनाप्रमाणे वस्तूवर्णनही सदर बखरीत चांगले साधले आहे. तत्कालीन परिस्थिती, वस्त्र, अलंकारांची माहिती यात आली आहे. सूचकता, आटोपशीरपणा, चित्रमुखता, निवेदनाचा प्रामाणिकपणा हे या बखरीचे विशेष आहेत.

### ३.शालीवाहनाची बखर –

शालीवाहनाचा काळ इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून ते इ.स. तिसऱ्या शतकापर्यंत होता. या बखरीच्या सध्या ज्या पोथ्या सापडतात त्यांची भाषा परंपरेने आधुनिक करून टाकली आहे. या बखरीच्या दोन प्रती उपलब्ध असून त्यातील एक हस्तलिखित व दूसरी मुद्रित आहे.



SANJAY MAR HRM

### शिवकालीन बखरी –

छत्रपती शिवाजी महाराज ही या कालखंडातील सर्वात प्रभावी विभूती असल्यामुळे त्यांचे जीवन आणि चरित्र हा अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय झाला आहे. या काळातील बऱ्याचशा बखरी शिवचरित्र वर्णनपर आहेत. त्यापैकी सभासदाची बखर समकालीन बखर असून बाकीच्या शिवचरित्र वर्णनपर बखरी उत्तरकालीन आहेत.

### १.सभासदाची बखर –

समकालीनाने लिहिलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले चरित्र म्हणून ऐतिहासिक प्रामान्यांच्या दृष्टीने या बखरीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिवाजी महाराजांपासून छत्रपती राजारामांपर्यंत दरबारी सभासद असलेल्या कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर लिहिली. शिवाजी महाराजांच्या जीवनातील बहुतेक महत्त्वाच्या प्रसंगाचे वर्णन त्यांनी केले आहे. त्यात महाराजांचे पूर्वचरित्र अगदी त्रोटक दिले असून अफजलखान वध, आग्रा भेट, शिवराज्याभिषेक आणि शिवाजी – व्यंकोजी भेट इ. प्रसंग सविस्तर आले आहेत. शिवराज्याभिषेक (शालीवाहन शके १५९६ ज्येष्ठ मास शुद्ध १३ ) व शिवरायांचे महाप्रयाण (शालीवाहन शके १६०२ चैत्र शु. १५ रविवार) या दोनच घटनांचा कालनिर्देश बखरीत केला असून उरलेल्या घटनांचा निर्देश पुढे, मग, त्याजवरी, त्याउपरी अशा शब्दांनी केलेला आढळतो.

घटनांचे विस्तृत वर्णन, राज्यकारभारातील १८ कारखाने, खजिना, शिलेदार, सुभेदार, गड इ. जमाखर्ची तपशील ही या बखरीची वैशिष्टे होत. या बखरीत अद्‌भूत प्रसंगांचे वर्णन आले आहे. उदा. शिवाजीच्या अंगात ६ वेळा भवानीचा संचार, मालोजीस शंभू महादेवाचा साक्षात्कार, मृत्यूसमयी शिवदूतांच्या विमानात बसून शिवाजी महाराजांचे कैलासगमन व त्यानंतर धरणीकंप इत्यादी वर्णन ऐतिहासिकदृष्टया प्रमाण मानता येत नाहीत.

अफजलखानाला दुर्योदनाची उपमा, दिलेरखान म्हणजे मोठा बळकट, एका हत्तीचे बळ इ. यथार्थ व्यक्तीदर्शन, ओघवती भाषा, अनुकूल वातावरण निर्मिती, छोटया छोटया वाक्यांतून साधलेले आकर्षक वास्तूवर्णन, प्रसंगचित्रण, व्यक्तीचित्र हे या बखरीचे वैशिष्टे आहे. या शिवाय शेवटी 'हे शिवचरित्र जे वाचतील त्यास मोठे पुण्य जोडेल, निपुत्रिकांस पुत्र होतील' अशी फलश्रृती सांगितली आहे. अशा प्रकारच्या अद्‌भूतरम्य पौराणिक फलश्रृतीमुळे बखरीतील ऐतिहासिक प्रामाण्याला बाधा येते. अर्थात असे असले तरी संस्कृत आणि फारसीयुक्त भाषायोजनेमुळे हे चरित्र वाचनीय झाले आहे. 'ये जातीचा कोणी मागे झाला नाही, पुढेही होणार नाही' अशा शिवाजी महाराजांच्या अतीव आदराने आणि उत्कट भावनेने ही बखर बहरलेली आहे.

### २.श्री.शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र –

मल्हार रामराव चिटणीस यांनी रचलेली 'श्री. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' ही शिवकालीन बखरींपैकी एक उल्लेखनीस बखर आहे. मल्हार रामराव चिटणीस हे सातारच्या प्रतापसिंह छत्रपतींच्या पदरी होते. या बखरीत त्यांनी १.पूर्वजन्मवर्णन जन्मकथा, २.राज्यआक्रमण ३.अफजलखान – यवन युद्ध प्रसंग ४.राज्यमर्यादा, स्थापना आणि पितृदर्शन ५.दिल्लीपतीचा पराभव ६.दक्षिण दिग्विजय ७. शिवाजीने सर्वात शेवटी

SANJAY MARATHI

राज्याभिषेक करून यशाचे सर्वोच्च शिखर कसे गाठले याचे चित्रण या सात प्रकरणात केले आहे. कारकुनी वळणाची साधी सोपी भाषा, छोटी वाक्ये, संस्कृत व फारशी शब्द, अलंकारिक भाषा आणि वर्णनात असलेली नाटयात्मकता यामुळे ही बखर आकर्षक झाली आहे. राजदरबाराचा अनुभव आणि बहुश्रुतता या गुणांनी त्यात मोलाची भर घातली आहे.

थोडक्यात सभासदाची बखर आणि दत्ताजी त्रिमल वाकेनवीसाची बखर सोडल्यास बाकी उरलेल्या बखरी उत्तरकालीन आहेत. त्या इतिहास आणि वाङ्मय गुणांनी संपन्न आहेत. या बखरींमुळे मराठी गद्याला डौलदार, आवेशपूर्ण भाषासौंदर्याने नटलेली शैली प्राप्त झाली. या बखरीमधून राष्ट्रीय भावनेचा उदय झाला आणि लोकमानसावर पराक्रम, नीती व कर्तृत्व यांचे संस्कार झाले.

### ३.शिवदिग्विजय –

खंडोबा बल्लाळ चिटणीसांनी १७२८ साली शिवाजीराजांचे चरित्र बऱ्याच विस्तृतपणे या बखरीत केले आहे. बारनिशी, दाखले, पत्रे, जुने ग्रंथ यांच्या आधाराने आपण शिवचरित्रकथा लिहित असल्याचा बखरकाराने उल्लेख केला आहे. तरीही यातील अनेक कालनिर्देश आणि व्यक्तीनिर्देश चुकीचे आहेत. अफजलखानाची भेट, शहिस्तेखानास शासन, औरंगजेबाची भेट यातील शिवरायांचे व्यक्तिचित्र अपूर्व आहे. अफजलखानाच्या भेटीत शक्तीपेक्षा युक्तीचा प्रत्यय अधिक येतो. शिवाजीराजांचे व्यक्तीदर्शन घडविताना बखरकारांनी त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धा सतत व्यक्त केली आहे. त्यांची भाषा प्रौढ आणि संस्कृत वळणाची आहे. मधून मधून ते संस्कृत श्लोकांचा वापर करतात. त्यांची शैली आकर्षक आहे.

## पेशवेकालीन बखरी –

शिवकालामध्ये शिवाजीमहाराजांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या परिणामातून बखरी निर्माण झाल्या. तशा पेशवेकालामध्ये पानिपतच्या लढाईच्या परिणामातून बखरी निर्माण झाल्या. प्रसंगात्मक, चरित्रात्मक, काही घराण्यांच्या हकिगती अशी विषयांची विविधता या बखरीत आढळते. पानिपतचा रणसंग्राम हे मराठयांच्या इतिहासातील एक स्वतंत्र पर्व आहे. या विषयावर अनेक बखरी लिहिल्या जाणे स्वाभाविक होते. 'भाऊसाहेबांची बखर' ही या सर्व बखरींची मुकुटमनी आहे.

### १.पानिपतची बखर –

शिवाजी महाराजांची बखर लिहिणारा तो **रघुनाथ यादव ऊर्फ चित्रगुप्त** तोच या बखरीचा लेखक आहे. पानिपतच्या युद्धानंतर अवघ्या दोन वर्षांच्या आत ही बखर लिहिली असल्यामुळे समकालीन बखर म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व आहे. गोपिकाबाईंच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव ऊर्फ चित्रगुप्त याने ही बखर लिहिली असून युद्धाच्या वेळी तो हजर होता. पानिपतचा तो करून भीषण रणसंग्राम आठवला की मराठी मन विषण्ण होते, तसे ते अभिमानाने भरूनही येते. सदाशिवराव भाऊ हा या बखरीचा नायक. केवळ त्याचेच नव्हे तर विश्वासराव, मल्हारराव, जानकोजी शिंदे या सर्वांची व्यक्तीचित्रे त्यांनी ठसठशीतपणे रेखाटली आहेत. शौर्य, धैर्य, दृढनिश्चय, राजनिष्ठा इ. मराठयांचे गुण या बखरीतून प्रकट होतात. आकर्षक वर्णनपद्धती हे या बखरीचे

महत्त्वाचे अंग. ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना यांच्याबद्दल विलक्षण आपुलकी, जिव्हाळा आणि पक्षनिष्ठा यामुळे व्यक्ती वर्णनात, प्रसंगवर्णनात जिवंतपणा उतरला आहे. **'हजारो हजार त्या कुरूक्षेत्री रणमंचकी निजलेच राहिले'** अशा उपमा सौंदर्याने बखरीचे वाङमयीन सौंदर्य वाढले आहे. या दृष्टीने ही बखर महत्त्वाची आहे.

## २.भाऊसाहेबांची बखर –

पानिपतच्या रणसंग्रमाचा सविस्तर वृत्तांत देणारी महत्त्वपूर्ण आणि वाङमय गुणांनी परिपूर्ण अशी समकालीन बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय. पानिपतच्या युद्धानंतर बहुधा दोन वर्षात ही बखर लिहिली असल्यामुळे, **'भाऊसाहेब मृत्यू पावले हे कोणी ऐकले नाही व पाहिले नाही. भगवंत इच्छेवरून त्या कहरातून पार पडून वाचून हर एक कोठे असले तरी निर्माण होतील.'** या संशयरूप उल्लेखावरून या बखरीचे लेखन लढाईनंतर लवकारात लवकर झाले असावे, असे दिसते. **'कृष्णाजी शामराव मुक्काम दिल्ली इंद्रप्रस्थ'** हा या बखरीचा लेखक असून त्याने **'राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकप्पा नाईक दिंडोरे कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशी'** ही युद्धाची हकिगत लिहून पाठविली आहे.

पानिपतच्या युद्धाने या बखरीचा दोन तृतीयांश भाग व्यापला असून उरलेल्या एक तृतीयांश भागात पानिपत ऐतिहासिक युद्धपूर्व मराठयांच्या राजकारणाचे वृत्त आहे. ऐतिहासिक घटनांची सविस्तर हकिगत लेखकाला माहिती आहे. मात्र या बखरीतील कित्येक घटना ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे विश्वसनीय मानणे कठीण आहे. जयाप्पाच्या खुनाच्या हकिकतीने इंदुरास मल्हारराव यांनी ऐकोन बाह्यार्थ श्रमी होणे, दत्ताजीचे **'बचेंगे तो और भी लढेंगे'** हे उद्गार, भाऊसाहेबास उत्तरेस पाठविण्यामागे पेशव्यांच्या बायकोची फूस होती, **रूपयांसाठी भाऊसाहेबांनी दिल्लीचे छत तोडले** यासारखी बखरकाराने केलेली विधाने ऐतिहासिक सत्याधी जुळणारी नाहीत.

व्यक्तीवर्णने, प्रसंगवर्णने आणि वस्तूवर्णने यांनी या बखरीइतकी दुसरी कुठलीही बखर समृद्ध नाही. उदा. **'नजीबखान रोहिला मात्र गमनी'** एवढया शब्दातच तो नजीबखानाचे व्यक्तीचित्र उभे करतो. **'ईश्वरे यश दिले तर उत्तम, नाही तरी पुन: तुमची आमची भेट स्वर्गी होईल'** असे युद्धापूर्वी निरवाणीचे उद्गार काढणारे बळवंतराव मेहंदळे, **'बचेंगे तो और भी लडेंगे'** असे जिद्दीने प्रत्युत्तर देणारा दत्ताजी अशी या बखरीतील कितीतरी व्यक्तीचित्रे जिवंत आणि अविस्मरणीय आहेत.

प्रासादिक, जोमदार आणि नाटयपूर्ण भाषा हे भाऊसाहेबांच्या बखरीचे नजरेत भरण्यासारखे वैशिष्टे. **'जसा डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली. जैसे भडमुंजे लाह्या भाजतात तशी गत केली. मुरगी मारी बचडे दाणादाण तैसे जिकडील तिकडे पळाले. शाळवाच्या पिकाप्रमाणे शिरे कापली.'** अशा धार्मिक व लोक व्यवहारातील उपमा – दृष्टांतांची रेलचेल या बखरीत आहे. बखरकाराचे काही सुंदर दोहेही या बखरीत पाहावयास मिळतात. उदा.

'जल की शोभा कमल है, दलकी शोभा पील
धन की शोभा धरम है, कुल की शोभा शील'



SANJAY MARATHI

यातून बखरीचे संस्कार सामर्थ्ये प्रकट होते. स्वकीयांच्या गौरवाची आणि परकियांच्या तिरस्काराची बखरकाराची वृत्तीही काही वाक्यातून दिसते. तसेच वाङमय आणि इतिहास यांचा सुरेख संगम या बखरीत आढळतो. मराठीतील इतर कोणत्याही बखरीपेक्षा ही बखर वाङमय गुणांनी संपन्न आहे.

## आज्ञापत्र

शिवशाहीतील राजनीतीचे निरूपण करणारा एक मौलिक ग्रंथ. राजारामास राजसबाईपासून झालेला मुलगा श्री राजा शंभुछत्रपती हा कोल्हापूरच्या गादीवर आल्यानंतर (१७१४) त्याच्या आज्ञेवरून रामचंद्र पंडित अमात्य यांनी हे आज्ञापत्र १७१५-१६ च्या सुमारास लिहिले. या ग्रंथाचा कर्ता अन्य कोणी असावा, असे काहींचे मत आहे. हे आज्ञापत्र लिहिण्यामागील प्रमुख हेतू दोन : "राजकुमार राजकार्यी सुशिक्षित व्हावेत" हा एक आणि "वरकड देशोदेशी ठेविले देशाधिकारी व पारपत्यागार यांणी नीतीने वर्तोन राज्य संरक्षण करावे" हा दुसरा.

आज्ञापत्रात एकूण नऊ प्रकरणे आहेत. पहिल्या दोन प्रकरणांत शिवाजीने स्वराज्यस्थापनेसाठी केलेल्या परिश्रमांचे आणि संभाजी व राजाराम यांनी ते टिकविण्याकरिता घेतलेल्या कष्टांचे वर्णन आलेले आहे. तीन ते नऊ ही प्रकरणे मुख्यत: राजनीतिविषयक असून त्यांत राजधर्म, प्रधानसंयोजन, सावकारी किंवा व्यापार, वतनदारांचे दायादत्व आणि त्यांचे नियंत्रण, वंशपरंपरागत सेवा-इनाम देण्यात प्रतिकूलत्व, सामाजिक वृत्तीविषयी अनुकूलत्व, गडकोटांचा बंदोबस्त, आरमाराचे महत्त्व आणि त्याची व्यवस्था असे विषय आले आहेत.

आज्ञापत्रात अष्टप्रधान संस्थेचा उल्लेख कोठेही नाही; सरकारकुनांचा आहे. प्रधानाची निवड करताना कोणते गुण ध्यानी घ्यावेत, या संबंधीचे विवेचन अत्यंत मार्मिक आहे. स्वराज्यात सावकारांचे व व्यापाऱ्यांचे स्थान काय आहे हे सांगून फिरंगी, इंग्रज, फ्रेंच वगैरे परकीय सावकारांच्या आक्रमक मनोवृत्तीचे वर्णन केले आहे. टोपीकरांस स्थललोभ कसा आहे, ती जात हट्टी कशी आहे, "हातास आले स्थळ मेलियाने" कसे सोडीत नाहीत, यांच्या "वखारेस जागा देणे आलेच ", तर ती खाडीच्या तोंडाशी का देऊ नये इ. बाबींचे स्पष्टीकरण लक्षणीय आहे.

गडकोटांविषयीचे प्रकरण विशेष महत्त्वाचे आहे. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग" असा आज्ञापत्रकारांचा निष्कर्ष आहे. गडकोटांसंबंधीचे विवेचन त्यांनी अत्यंत बारकाईने केले आहे. वतनदारांविषयी आज्ञापत्राततीव्र तिटकारा व्यक्त केलेला आहे. कोणालाही कोणत्याही कारणास्तव जमिनी इनाम देऊ नयेत, हे स्पष्ट केले आहे. तथापि धर्मार्थ जमीन देणे असल्यास धर्माधर्माचा सूक्ष्म विचार करून ती द्यावी, असेही म्हटले आहे. आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यांगच आहे, असे सांगून "ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र" असे मार्मिकपणे नमूद केले आहे.

आज्ञापत्राची लेखनशैली संस्कृतप्रचुर असली, तरी प्राय: अनलंकृत आहे.लेखनकाळानुसार आज्ञापत्रात फार्सी शब्दही आले आहेत. विषयाचा अचूक वेध घेणारी शब्दयोजना हे आज्ञापत्राचे एक वैशिष्ट्य आहे. पुष्कळदा विशेषणे लावताना शब्दांची माळ निर्माण केली जाते, तर अनेकवार राजनीतिविषयक सखोल आशय छोट्या छोट्या वाक्यांतून सहजपणे व्यक्तविला जातो. मराठेशाहीतील उत्तम गद्यलेखनाचा तो एक नमुना आहे.

आज्ञापत्रे ही मोडी मराठीतील सुमारे ७000 शब्दांची पटकथा आहे. हे दोन विभागात विभागले गेले आहे. पहिल्या भागात मराठा साम्राज्य निर्माण आणि जपण्यात छत्रपती शिवराय आणि त्यांचे पुत्र यांच्या कर्तृत्वाचे थोडक्यात वर्णन आहे. दुसऱ्या विभागात त्यांनी छत्रपती शिवरायांच्या बरोबर काम करताना राज्याच्या धोरणाची तत्त्वे आणि प्रशासनाच्या विविध पैलूंची चर्चा केली आहे. यामध्ये राजा - कर्तव्ये आणि जबाबदारी, प्रशासन, नियुक्ती, मंत्री

- पात्रता, भूमिका, व्यापारी - महत्त्व, वाढ, वतनदार (जमीन धारक) - तथ्ये, जतन, बंद, जमीन भेटी आणि इनाम (भेटी) - तोटे मार्ग आणि साधने, किल्ले - संरक्षण, बांधकाम आणि पुनर्निर्माण आणि नौदल (आरमार) - महत्त्व, खबरदारी या मुद्यांचा समावेश आहे.

समारोप –

बखर हा शब्द बखैर, बखेर, बखर अशी विविध रूपे घेऊन तयार झाला आहे. बखैर म्हणजे आख्यायिका आणि आख्यायिका म्हणजे इतिहास कथा. याच अर्थाने बखर शब्द मराठीत रूढ झाला आणि पुढे एका वाङ्मय प्रकाराच्या नावाने ओळखला गेला. बखरीत राजकीयदृष्टया इतिहास आणि वाङ्मयदृष्टया कथा निवेदन हे दोन महत्त्वाचे घटक असतात. गद्यात्मक लेखन हा आणखी एक विशेष होय. बखरीचे बहिरंग आणि अंतरंग असे आविष्काराच्या दृष्टीने दोन प्रकार पडतात. शिवपूर्वकालीन व शिवकालीन बखरीमागील प्रेरणा सुप्त असून बखरीच्या वाङ्मयीन वैशिष्टयांवरून अनुमान करावे लागते. पेशवे काळात बखर वाङ्मयाला बहर आला आणि वाङ्मयीन प्रेरणेची जाणीव अधिक स्पष्ट झाल्याचे दिसून येते. बखर वाङ्मयाचा आढावा घेताना आपण शिवपूर्वकालीन, शिवकालीन व पेशवेकालीन बखरी अशी विभागणी करून या सर्व बखरींचा विचार केला. बखरकार इतिहासाचे कथन करीत असतो. तरी तो इतिहासकार नव्हे तर कलावंत आहे. इतिहासाचे केवळ दर्शन नव्हे तर रंजन करणे हा ही बखरकाराचा हेतू आहे. बखरी ऐतिहासिक घटनेवर आधारित असल्या तरी इतिहासातील वस्तुनिष्ठता त्यात नसते. बखरकार बखर नुसता लिहित नसतो तर ती तो सजवत असतो. त्यामुळे बखर हा एक स्वतंत्र वाङमयप्रकार ठरतो. बखरकार स्वपक्षाबद्दल आत्मीयता ठेवत असल्यामुळे सत्याचा अपलाभ होताना दिसतो. शिवाय बखरीचा प्रारंभ व शेवट करताना तो पुराण पद्धतींचा अवलंब करतो.

रेखीव रचना, कल्पना चातुर्य, निवेदन कौशल्य ही वरील सर्व बखरींची महत्त्वाची वैशिष्टे आहेत. व्यक्तीदर्शन, वर्णनपद्धती आणि भाषाशैली या वाङमयीन गुणवैशिष्टयांमुळे वरील बखरी आकर्षक आणि मनोरंजक झाल्या आहेत. प्रौढ व रसाळ भाषा, संस्कृत आणि फारसीप्राचुर्य, पौराणिक दाखले, अलंकार, सुभाषिते, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर, दंतकथा आख्यायिकांचा आश्रय, सैन्य, दूर्ग, गड यांची जमा खर्च पद्धतीने दिलेली माहिती, कधी व्यक्तीदर्शन व प्रसंगनिर्मितीसाठी लहान सुटसुटीत वाक्ये तर कधी तपशीलवार निवेदनासाठी येणारी लांबलचक वाक्यरचना असे या बखरींच्या लेखनशैलीचे स्वरूप आहे. बखरीतील ललित भाषा जिवंत आणि रसरशीत आहे. तसेच बहुतेक बखरी गौरवार्थ लिहिल्या गेल्याने पक्षपातीपणा आला आहे. मराठी गद्याला डौलदार, ऐटबाज, भारदस्त, नाटयपूर्ण स्वरूप प्राप्त करून देण्याचे श्रेय वरील सर्व बखरकारांना द्यावे लागते.

कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज (राजाराम छत्रपतींचे पुत्र) यांच्या आज्ञेवरून **रामचंद्र पडित अमात्य** यांनी इ.स. १७१५–१६ च्या सुमारास आज्ञापत्र लिहिले. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे निवेदन करणारा हा अत्यंत मौलिक ग्रंथ. त्याचे दोन उद्देश होते. राजकुमारांना राजनीतीचे शिक्षण मिळावे आणि मुत्सद्दीपणाने राज्याचे संरक्षण कसे करावे या संबंधीची धोरण स्पष्ट करावे. आज्ञापत्र या ग्रंथात ९ प्रकरणे आहेत. शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी केलेले परिश्रम, ते सुरक्षित ठेवण्याचे त्यांचे धोरण, वतनदार, प्रधानमंडळ, त्यांची निवड, त्यांच्यावर

नियंत्रण, किल्ल्यांचा बंदोबस्त, आरमाराची रचना आणि महत्त्व, परकीय सावकरांची आक्रमक वृत्ती इत्यादी विषयासंबंधी अमात्यांनी विचार व्यचक्त केले आहेत. मराठेशाहीतील हा एक लक्षणीय आणि मौलिक ग्रंथ आहे. शिवकालीन भाषेच्या स्वरूपाचे यथार्थ दर्शनही या ग्रंथातून घडते. आज्ञापत्र प्रथम १८७५–७६ या काळात 'विविधज्ञानविस्तार' मधून क्रमशः प्रसिद्ध झाले. १९२३ मध्ये ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. अशा प्रकारे आज्ञापत्र हे गद्यलेखनाचा उत्कृष्ट नमुना आहे. शिवकालीन राज्यव्यवस्था, संरक्षण व्यवस्था, व्यापार नीती वगैरे गोष्टींचा बारीक विचार, सूक्ष्म निरीक्षण यात आहे. ऐतिहासिक पत्रे हा ही गद्याचा नमुना होय.

.......................................................................................................................................

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास नसिराबादकर.रा.ल :**
२) **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : अ.ना.देशपांडे**

SANJAY MAR HRM